# आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ

श्री विठ्ठल देवालय ट्रस्ट मेन रोड, रेंदाळ,
ता.हातकणंगले जि.कोल्हापूर पिन. क्रं. ४१६ २०३
फोन.क्रं. ०२३०- २४५०१२३, २४५१९७०, २४५१३७०
rendalbank@sancharnet.in rendalbank०१rediffmail.com
www.rendalbank.com


## जाहिर निवेदन

### (फक्त सभासदांसाठी)

**विषय – अपूर्ण भाग (शेअर्स) रक्कम भरपाई करणे व इतर बाबीबाबत.**

बँकेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १३/०४/२०१३ विषय क्रं. २ ने मंजूर केलेले आदर्श उपविधिनुसार बँकेच्या भागाचे मुल्य (शेअर्स व्हॅल्यु) रु. ५०/- वरुन रक्कम रु. १०००/- करणेत आलेली आहे. तसेच सदर उपविधिस सहकारखात्याचे पत्र जावक क्रं. कक्ष २/ना.बँका/रेंदाळ बँक/पो.नि.दु.-सन २०१४ दिनांक २९/०३/२०१४ ने मंजूर करणेत आलेले आहेत. त्याचबरोबर बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १२/०९/२०१५ ठराव क्रं. ९ नुसार बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ७ कोटी करणेत आले असून बँकेच्या एका (१) भागाची रक्कम रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) नुसारचे पोटनियम दुरुस्त होऊन त्यास सहकार खात्याने मान्यता दिलेली आहे. सहकार खात्याच्यां मान्यतेने दुरुस्त पोटनियम अस्तित्वात आलेले आहेत.

अपूर्ण भागाची रक्कम भरणेबाबत बँकेकडून संबंधित सभासदांना रजिस्टर पोहोच पावती टपालाद्वारे पत्रे पाठविणेत आलेली होती. सदर पत्रास अनुसरुन बहुतांश सभासदांनी जरुर ती पूर्तता केलेली आहे.

- मात्र, अपूर्ण भागधारक सभासद व्यक्ती मयत असलेचे कारणास्तव टपालखात्याकडुन बँकेस काहि पत्रे परत आलेली आहेत. अशा सभासदांचे नोंद वारसास बँकेकडुन अलाहिदा पत्रे पाठविण्यात येत आहेत त्यानुसार वारसांनी बँकेशी संपर्क साधून तात्काळ पूर्तता करावी.
- काहि सभासदांची पत्रे चुकीचा पत्ता/अपूरा पत्ता/ या पत्यावर राहत नाही या कारणासाठी परत आलेली आहेत.ज्या सभासदांना या नमूद कारणामुळे सदरचे पत्र मिळाले नाही त्यांनीं सुध्दा अपूर्ण भागाची (शेअर्स) रक्कम भरणा करणे अनुषंगाने तात्काळ बँकेशी संपर्क साधावा.
- तसेच ज्या सभासदांनी रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) चे वर भागधारण केलेले आहेत. मात्र, भागधारणा रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) चे पटीत नाही त्यांनी उर्वरित रक्कम भरणा करुन आपली भागधारणा (शेअर्स) रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) चे पटीत तात्काळ करुन घ्यावी.

उदाहरणार्थ - सभासदाने रुपये १४००/- (रुपये एक हजार चारशे फक्त) शेअर्स धारण केलेले असतील तर त्यांने उर्वरित रक्कम रुपये ६००/- (रुपये सहाशे फक्त) भरावी.

- ज्यां सभासदांनी अद्याप केवायसी / सी केवायसी अनुषंगाने आधारकार्ड, पॅनकार्ड, अद्यावत २ फोटो व फॉर्म भरुन दिलेला नसेल त्यांनी त्याची तात्काळ संबधित शाखेकडे पूर्तता करावी.
- ज्या सभासदांनी डिव्हिडंडची रक्कम अद्याप नेलेली नसेल त्यांनी तीसुध्दा घेऊन जावी. अन्यथा बँकेच्या पोटनियमातील तरतुदीनुसार ३ वर्षावरील देय डिव्हीडंडची रक्कम मा. संचालक मंडळाचे मंजुरीने रिझर्व्ह फंडास वर्ग केली जाईल.

मा. संचालक मंडळ सभा दिनांक ०४/०१/२०२० ठराव क्रं. ११ नुसार सदरचे निवेदन प्रसिध्द करणेत येत आहे.

| सही/- | शिक्का | सही/- |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | | चेअरमन |
| **श्री. सूर्यकांत शंकरराव जाधव** | | **श्री. अरुण दत्तात्रय महाजन** |